तक्रार (यु एल पी) २/२०२१

निशाणी क्रमांक यु—७

**शपथेवर उलटतपास सुरू**

**उलटतपास — विधिज्ञ श्री. ग्रामोपाध्ये, जाबदार क्रमांक २ तर्फे**

७. माझे शिक्षण इयत्ता ११वी पास असे आहे. दिनांक ३१.३.२०१८ रोजी पासून मी नगरपंचायतीचा कर्मचारी झालो. मी नगरपंचायतीमध्ये वाल्वमन म्हणून काम करत होतो. मी २०१८ साली नगरपंचायतीचा कर्मचारी झाल्यापासून म्हणजेच दिनांक ३१.३.२०१८ पासून माझे सेवानिवृत्ती होईपर्यंत म्हणजे दिनांक ३१.५.२०१९ पर्यंत मी नगरपंचायतीकडे माझी पूर्वीची सेवा विचारात घ्यावी असा अर्ज केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की नगरपंचायतीच्या सेवाजेष्ठतायादीमध्ये माझी पूर्वीची सेवा ग्राहय धरून सेवाजेष्ठता निशिचीत केली असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पगारपत्र २०१६ मध्ये मी नगरपंचायत कर्मचारी झाल्यापासून सुरू झाले. २०१८ साली शासन निर्णय होऊन त्याद्वारे ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये समावेशन झाल्यानंतर संबंधित कर्मचा—यांची सेवाजेष्ठता व निवृत्तीवेतन लाभासाठी दिनांक निश्चिती करण्यात आली या बाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की मला सेवानिवृत्तीचे लाभ देण्यासाठी माझ्या फक्त नगरपंचायतीमधील सेवेचा कालावधी ग्राहय धरण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की नगरपंचायतीने मला असे कळविले होते की माझे ३१.३.२०१८ पासूनची सेवा सेवानिवृत्ती लाभासाठी ग्राहय धरता येईल व मला कुठलाही लाभ देता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मला नगरपंचायतीमध्ये रूजू झाल्यापासून हे माहित होते की माझी ग्रामपंचायतमधील सेवा ग्राहय धरली जाणार नाही. माझी सेवानिवृत्ती झाल्यानंतर मला असे समजले नाही की माझे ग्रामपंचायतीमधील सेवा ग्राहय धरली जाणार नाही. मी या संदर्भात आस्थपनेकडे कसलाही अर्ज अथवा अपील केले नाही. मी उच्च न्यायालयामध्ये शासन निर्णया विरूध्द कुठलीही याचीका दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की कुठलाही लाभ मिळण्यास मी पात्र नसतांना

खोटा तक्रारी अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे वरिष्ठ किंवा नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी यांच्याशी कुठलेही वैयक्तिक भांडण नाही किंवा माझ्या विषयी द्वेषभाव म्हणून कारवाई झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की जाबदार कुठल्याही अनुचित कामगार प्रथेत सहभागी नाही.

उलटतपास संपला

फेरतपास काही नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

सांगली (रा. व. उत्पात)

सदस्य

दिनांक : २१.०८.२०२५ औद्योगिक न्यायालय, सांगली